अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड






www.surajyadigital.com | मंगळवार, दि. २३ मे २०२३ | वर्ष : २१ वे | अंक : २३३ वा किंमत : ५ रुपये | पाने ८


# पोहण्याचा आनंद क्षणिक ठरला, दोघा मित्रांवर काळाचा घाला

## हिप्परगा तलावात बुडून अंत, मृत्यू दिसताच दोघे एकमेकांना कवटाळले

सुराज्य/सोलापूर

**सोलापूर-तुळजापूर रस्त्यावरील हिप्परगा येथील तलावात पोहण्यासाठी गेलेल्या दोघा जिवलग मित्रांचा पाण्यात बुडून अंत झाला. खोल पाण्यात बुडताना दोघा मित्रांनी एकमेकांना वाचविण्याचा प्रयत्न केला. मात्र यश आले नाही. शेवटी दोघां मित्रांनी एकमेकांना मिठी मारत अखेरचा श्वास घेतला. तब्बल २४ तासानंतर दोघांचा मृतदेह एकमेकांना कवटाळलेल्या अवस्थेत तलावाच्या पाण्यावर तरंगताना आढळला. सोलापुरातील दोन तरुणांनी सार्वजनिक जीवनात आपली दोस्ती कायम ठेवली होती. पोहण्याचा आनंद क्षणिक ठरला. मृत्यू दिसताच आयुष्याच्या शेवटच्या क्षणीही या मित्रांनी एकमेकांना कवेत घेतले. तलावाभोवती जमलेल्यांना हा दोस्ताना पाहून गहिवरून आले होते.**

नागेश रमेश बोल्लू (वय २६) आणि राज सुरेश गवळी (वय २१ दोघे रा. सग्गमनगर, मुळेगावरोड, विडी घरकुल) अशी मयत झालेल्या मित्रांची नावे आहेत. रविवारी दुपारी तीन वाजण्याच्या सुमारास नागेश व त्याचा मित्र राज आणि अन्य दोघे असे चौघेजण लग्नातील जेवण करून हिप्परगा तलावात पोहण्यासाठी दुचाकीवरून गेले होते. पोहताना पाण्याचा अंदाज न आल्याने नागेश आणि राज गटांगळ्या खाऊ लागले.त्यावेळी त्याच्या दोघा साथीदारांनी आरडा ओरड केली. तलावात पोहणाऱ्या अन्य लोकांनी त्यांना वाचविण्याचा प्रयत्न केला.

मात्र ते दोघे एकमेकांना मिठी मारीत पाण्यात बुडाले. ही घटना समजल्यानंतर तलाव परिसरातील नावाडी, सोलापूर तालुक्याचे पोलीस कर्मचारी यांनी सायंकाळपर्यंत पाण्यात दोघांचा शोध घेतला. मात्र त्यांचे मृतदेह आढळले नाही. त्यानंतर सोमवारी सकाळी पुन्हा पोलीस, नावाडी आणि अग्निशामकच्या पथकाने अथक परिश्रम घेतले. मात्र त्यांना यश आले नाही. त्यानंतर दुपारी दोन वाजण्याच्या सुमारास दोघांचे मृतदेह एकमेकांना मिठी मारलेल्या अवस्थेत पाण्यावर तरंगताना आढळून आले. त्यानंतर पोलिसांनी मृतदेह ताब्यात घेतले व ते शासकीय रुग्णालयात पाठवले. सायंकाळी शवविच्छेदन झाल्यानंतर दोघांचे मृतदेह त्यांच्या नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आले. ही वार्ता समजताच विडी घरकुल परिसरात शोककळा पसरली.



### दोघेही अविवाहित

मयत नागेश बोल्लू हा अविवाहित असून याच्या पश्चात आई-वडील आणि एक विवाहित बहीण असा परिवार आहे. तो एका कॉम्प्युटरच्या दुकानात कामाला होता. तर त्याचा मित्र राज सुरेश गवळी हा देखील अविवाहित असून त्याच्या पश्चात आई आणि वडील असा परिवार आहे. तो सिद्धेश्वर मार्केटयार्ड येथे माथाडी काम करीत होता. या घटनेची नोंद तालुका पोलिसात झाली असून तपास फौजदार जाधव करीत आहेत.

### फायर ब्रिगेडचीही मदत

हिप्परगा तलावात दोघेजण बुडाल्याची खबर रविवारी मिळाल्यानंतर अग्निशामक दलाची टीम तिकडे रवाना झाली. सायंकाळपर्यंत शोध घेतला पण ते दोघे तरुण सापडले नाहीत. ही टीम सोमवारी सात वाजता पुन्हा गेली. दोघांचे प्रेत फुगून वर आले होते. अग्निशामक दलाच्या जवानांनी दोरी लावून प्रेत बाहेर काढले व पोलिसांच्या ताब्यात दिले, असे दलाचे प्रमुख केदार आवटे यांनी सुराज्यशी बोलताना सांगितले.

## पोखरापूर येथे एकाने दुसऱ्या कामगाराच्या डोक्यात दगड घालून केला खून

सुराज्य/मोहोळ

**पोखरापूर (तालुका मोहोळ) येथे आकाश ढाब्यावर काम करणाऱ्या कामगाराचा डोक्यात दगड घालून खून केला ही घटना सोमवारी सकाळी घडली.**

मोहोळ पंढरपूर रोडवर पोखरापूर जवळ आकाश हॉटेल नावाचा ढाबा आहे. हॉटेलचे मालक धनाजी वामन गायकवाड हे दररोज रात्री १२ वाजता बंद करतात. बाहेर गावचे कामगार त्याच ठिकाणी हॉटेलच्या पाठीमागे असलेल्या रूममध्ये राहण्यास आहेत.

पहाटे ६ वाजण्याच्या सुमारास हॉटेलचे मालक गायकवाड यांना हॉटेलमधील वस्ताद बाल मुकुंद चौधरी यांनीफोन करून सांगितले की मालिक संदीपने संजू मुहपर बडा पत्थर डाला हैऔर उसका दोस्त सत्येंद्र वर्मा के साथ वो भाग गया है, संजू के मुह से बहुत खून बह रहा है असे सांगितले आणि मालकांनी तातडीने आपल्या मित्राला सोबत घेऊन हॉटेल गाठट ले . आणि जाऊन पाहिले असता धर्मेंद्र उर्फ संजीव यादव हा रक्ताच्या



थारोळ्यात पडला होता त्याच्या तोंडातून नाकातून कानातून रक्त येत होते व त्याचे डोक्याच्या बाजूलाच रक्त लागलेला मोठा दगड पडला होता. त्यावेळी वस्ताद बाल मुकुंद चौधरी यास संदीपने संजय यादव को किंवा मारा असे विचारले असता त्यांनी सांगितले की संजू हा संदीपच्या वहिनीच्या बहिणीला चोरून फोन करत होता.

या कारणावरून त्यांचेच रात्री एक दीड वाजण्याच्या सुमारास वादावादी झाली होती त्यांचे भांडण लागले होते. त्यानंतर त्यांचे भांडण सोडवून सर्व जण झोपी गेले होते. सकाळी सहा वाजता त्यांना जाग आली तेव्हा पाहिले असता संदीप यादव हा मोठा दगड घेऊन संजय यादव याचे अंगावर दगड उचलून टाकत असताना त्याने पाहिले आणि लगेच त्याला धक्का दिला . त्यावेळी तो दगड खाली पडला त्याच वेळी सत्येंद्र वर्मा हा पण जागा झाला संदीप यादव आणि वर्मा सोबत घेऊन पळून गेला.

रात्री झालेल्या भांडणाच्या कारणावरून संदीप यादव याने धर्वेद्र उर्फ संजीव यादव यांच्या तोंडावर सकाळी ६ वाजता मोठा दगड मारून जीवे ठार मारले असे वस्ताद बाल मुकुंद चौधरी यांनी मालकांना हिंदी मध्ये सांगितले. मालक गायकवाड यांनी पोलीस स्टेशन गाठून याबाबत माहिती देऊन कायदेशीर फिर्याद दिली. धर्वेद्र उर्फ संजीव राजीव यादव यास जीवे ठार मारणारा संदीप रामनरेश यादव याच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. घटनेचा तपास मोहोळ पोलीस करत आहेत.

## मुलाच्या मारहाणीत आईचा मृत्यू

सुराज्य/सोलापूर

पैसे देण्या-घेण्याच्या कारणावरून सख्या आईस मुलाने मारहाण केल्याने उपचारादरम्यान आईचा मृत्यू झाला. या घटनेची हकिकत अशी की,शकुंतला बाळू खुडे (वय-५५ रा.शिवाजीनगर बार्शी) यांच्याबरोबर १८ मे रोजी सायंकाळी ६ वाजताच्या सुमारास मुलगा श्याम बाळू खुडे यांनी पैसे देणे घेण्याच्या कारणावरून भांडण सुरू केले.

भांडण विकोपास गेल्यानंतर श्याम याने पोते उचलण्याच्या हुकाने आईला मारहाण केली. जखमा झाल्याने बार्शी येथे प्राथमिक उपचार करून त्यांना पुढील उपचाराकरता सिव्हिल हॉस्पिटलमध्ये दाखल केले होते.उपचारादरम्यान ४ दिवसानंतर आईचे निधन झाले.या घटनेची नोंद तालुका पोलीस ठाण्यात झाली आहे.

## महाशिबिरात तीन हजारांहून अधिक दाखले वाटप

सुराज्य/सोलापूर

शासन आपल्या दारी व महाराजस्व अभियानांतर्गत तहसील कार्यालय, उत्तर सोलापूरच्या वतीने आयोजित महाशिबिरात आजच्या तिसऱ्या दिवशी १ हजार १८ दाखल्यांचे वाटप करण्यात आले. या महाशिबिरात पहिल्या दिवशी १०३१ दुसऱ्या दिवशी १२२१ तर आज असे एकूण तीन हजार २७० दाखल्यांचे आजपर्यंत वाटप करण्यात आले.

या महाशिबिरास आ. सुभाष देशमुख, प्रणिती शिंदे यांनी आज भेट देऊन मार्गदर्शन केले. त्यांच्या हस्ते दाखले वाटप करण्यात आले. यावेळी प्रभारी जिल्हाधिकारी तुषार ठोंबरे, उपविभागीय अधिकारी सोलापूर क्रमांक १ विठ्ठल उदमले, उत्तर सोलापूरचे तहसीलदार सैपन नदाफ, प्रभारी गटविकास अधिकारी एम. ए. पाटील आदी उपस्थित होते. या महाशिबिरात दोन्ही हात नसलेल्या दिव्यांग लक्ष्मी संजय शिंदे या युवतीला संजय गांधी निराधार योजनेंतर्गतचा लाभ अर्ज केल्यापासून अवघ्या १० दिवसात देण्यात आला. याचप्रमाणे दिव्यांग, ज्येष्ठ नागरिक अशा अनेक गरजूंना दाखले वाटप करण्यात आल्याने समाधान व्यक्त करण्यात येत आहे. नॉर्थ कोट प्रशाला, पार्क चौक येथे हे महाशिबिर सुरू आहे.

## खुनेश्वर येथे वीज पडून महिला ठार; तीन गायींचा मृत्यू

सुराज्य/मोहोळ

खुनेश्वर (ता.मोहोळ) येथे शेतामध्ये काम करीत असताना असताना अंगावर वीज पडल्याने महिला गंभीर जखमी होऊन जागेवरच मयत झाली. ही घटना सोमवारी दि.२२ मे रोजी साडेपाच वाजता घडली.

याबाबत मोहोळ पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार रामकृष्ण नामदेव घाडगे हे त्यांची बहीण सुदामती जाधव व सून सुवर्णा जोतिबा घाडगे (वय ३९) असे शेतामध्ये काम करण्यासाठी गेले होते. दिवसभर शेतामध्ये काम केल्यानंतर सोमवारी दि.२२ मे रोजी संध्याकाळी साडेपाच वाजता वादळ वारे सुटले आणि पावसाचे वातावरण तयार झाले त्यामुळे बहीण सुदामती आणि सून सुवर्णा एक घराकडे निघाले होते त्यावेळी मोठ्याने आकाशामध्ये वीज कडाडली आणि सुवर्णाच्या अंगावर येऊन पडली.त्यामुळे सुवर्णा ही जागीच खाली पडली. त्यांना तातडीने उठवण्याचा प्रयत्न केला असता त्या उठू शकल्या नाहीत. त्यांना मोहोळ येथे ग्रामीण रुग्णालयात डॉक्टरांनी तपासणी करून त्या उपचारापूर्वीच मयत झाल्या असल्याचे सांगितले. त्याच बरोबर नजिक पिंपरी येथील युवराज पाटील यांच्या शेतात वीज पडून तीन गायींचा मृत्यू झाला आहे.

पारा उतरल्याने सोलापूरकरांना दिलासा

## पंढरपुरात वादळी वाऱ्यासह अवकाळी पाऊस

सुराज्य/सोलापूर

सोलापूर शहराचा पारा सोमवारी उतरला.४३.५ वरून तापमान ४१.६ पर्यंत खाली आले.पारा खाली आला तरी दिवसभर उन्हाच्या झळा बसल्या आणि उकाड्याने अंगाची लाहीलाही झाली. सायंकाळी ढगाळ हवामान निर्माण झाले. वाऱ्यामुळे सोलापूरकरांना थोडा दिलासा मिळाला.



दरम्यान पंढरपूर शहरात वादळी वाऱ्यासह पावसाने हजेरी लावली.त्यामुळे उकाड्याने हैराण झालेल्या पंढरपूरकर वासीयांचा श्वास मोकळा झाला. पंढरीत अचानक सोसाट्याचा वारा सुटला. त्यानंतर पावसाने हजेरी लावली. उकाड्याने हैराण झालेल्या पंढरपूरकर वासीयांना पावसाने दिलासा दिला. अचानक सोसाट्याचा वारा सुटला. त्यानंतर पावसाने हजेरी लावली. तालुक्यात काही ठिकाणी गारांचा पाऊस तर शहरात हलक्या सरी कोसळल्या. काही ठिकाणी झाडे उन्मळून पडले आहेत.गेले काही दिवस उन्हाचा पारा चाळीशी पार झाला होता. त्यामुळे नागरीक उन्हाने त्रस्त झाले होते. मात्र सोमवारी पाचच्या सुमारास वारे वाहू लागले. पुढे सोसाट्याचा वारा सुटला. शहरात या वाऱ्याने अनेकांची धांदल उडाली. तर आडोसा शोधून थांबले. त्यानंतर पावसाने हजेरी लावली. पावसाच्या हलक्या सरी शहरात कोसळल्या. शहरात अनेक ठिकाणी घरावरील पत्रे उडाले. ग्रामीण भागात अनेक ठिकाणी पावसाने दमदार हजेरी लावली.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे




आपला फंडा !!!


कल्याण
668-05-357

मेन बाजार
169-62-110


## दोन हजारच्या नोटा बदलून देण्याची कार्यवाही आजपासून

### ▪ नव्या नोटांची छपाई युद्धपातळीवर, ओळखपत्र बंधनकारक करण्याची मागणी

सुराज्य/मुंबई

**भारतीय रिझर्व्ह बँकेच्या निर्णयानुसार २००० रुपयांच्या नोटा बदलून देण्याची कार्यवाही मंगळवारपासून केली जाणार आहे. त्यामुळे बँकांमध्ये गर्दी होणार काय? तसेच नोटांच्या बंडला टाकायला कोणकोण येणार याविषयी सर्वत्र उत्सुकता निर्माण झाली आहे. विविध बँकांमधून या नोटा बदलून घेण्यासाठीची मुदत ३० सप्टेंबर २०२३ पर्यंतच दिली असून ही नोट वैधच राहणार असल्याचे आरबीआयचे अध्यक्ष शक्तीकांत दास यांनी स्पष्ट केले आहे.**

आरबीआयचा २००० रुपयांच्या नोटा चलनात आणण्याचा उद्देश पूर्ण झाला आहे. आता २००० रुपयांच्या नोटा बदलून जमा केल्या जातील आणि या सर्व प्रक्रियेत सर्वसामान्यांना कोणत्याही प्रकारचा त्रास होणार नाही.




यासंदर्भात बँकांना पूर्णपणे तयार राहण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत, असेही त्यांनी सांगितले. या कालावधीत दुकानदार असो वा पेट्रोलपंप चालक कोणीही ही नोट स्वीकारण्यास नकार देऊ शकत नाही, अशी सूचना त्यांनी केली आहे.

### ५०० च्या जवळपास २ हजार ८०० मिलियन नोटांची होणार छपाई

अशातच २०००च्या नोटा चलनातून बाद होणार असल्याने भविष्यात ५०० रुपयांच्या नोटांची मागणी वाढणार आहे. त्याचा विचार करून नाशिकच्या नोटप्रेसमध्ये पाचशेच्या जवळपास २ हजार ८०० मिलियन नोटांची छपाई करण्यात येणार आहे. पाचशेच्या जवळपास २ हजार ८०० मिलियन नोटांची छपाई करण्यात येणार असल्याने नाशिकच्या नोट प्रेसमधील १५०० कामगारांना येत्या २ दिवसात पुढील ४ महिन्याच्या कालावधीत नोटबंदीच्या काळाप्रमाणेच २४ तास कामकाज करावे लागणार आहे. २०१८-१९ मध्येच २००० रुपयांच्या नोटांची छपाई थांबवण्यात आली होती. काही महिन्यांपूर्वी अर्थ मंत्रालयाने नाशिक करन्सी नोट प्रेसला ५०० रुपयांच्या नोटांची छपाई करण्याचे उद्दिष्ट दिले होते. एप्रिलपासून आतापर्यंत ३० कोटी नोटांची छपाईही झाली आहे.

**काम युद्धपातळीवर :** येत्या काही दिवसांतच २ हजार रुपयांची नोटच चलनातून बाद होत असल्याने एक दोन हजाराची नोट बदलून देण्यासाठी पाचशे रुपयांच्या ४ नोटा लागणार असल्याने ५००च्या नोटांची मागणी वाढणार आहे. अपुऱ्या मनुष्यबळातही हे उद्दिष्ट कामगार पूर्ण करतील असा मजदूर संघाच्या नेतृत्वाला विश्वास आहे. सध्या २ हजारांच्या अंदाजे १ हजार ८३३ मिलियन नोटा बाजारात आहेत. म्हैसूर, सालभोनी, देवास आणि नाशिकमध्ये या नोटा तयार केल्या जाणार असून येत्या ४ महिन्यात २ हजार ८०० मिलियन नोटाची छपाई एकट्या नाशिक नोटप्रेसमध्ये होणार आहे.

**ओळखपत्र आवश्यक करा, दिल्ली हायकोर्टात याचिका :** दोन हजार रुपयांच्या नोटांचं प्रकरण आता दिल्ली उच्च न्यायालयात पोहोचले आहे. भाजप नेते अश्विन उपाध्याय यांनी कोर्टात जनहित याचिका दाखल केली आहे. यामध्ये दोन हजारांच्या नोटा ओळखपत्राशिवाय बदलण्यावर आक्षेप घेण्यात आला आहे. ओळखपत्राशिवाय दोन हजारांच्या नोटा बँकेतून बदलून घेणे हे तर्कहीन आणि भारतीय संविधानाच्या अनुच्छेद १४चे उल्लंघन असल्याचे म्हटले आहे. आरबीआय आणि एसबीआयला संबंधित खात्यातच पैसे जमा करण्याचे निर्देश देण्याची मागणी करण्यात आली आहे. इतर कोणत्याही बँकेत जाऊन पैसे जमा करता येणार नाहीयेत. त्यामुळे काळापैसा ठेवणाऱ्या लोकांपर्यंत सहज पोहोचता येईल. तसेच भ्रष्टाचार आणि अवैध मालमत्ता, उत्पन्नापेक्षा अधिक संपत्ती असणाऱ्या लोकांशिवाय योग्य कारवाई करण्यात यावी, असे निर्देश देण्याची मागणी याचिकेत करण्यात आली आहे.